# बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र. एमडीएफ/ओडी/1164/जन दिनांक 22.07.2022.

## परिपत्रक

**विषयः-** गणेशोत्सव 2022 करिता सुधारित मार्गदर्शीका.

**संदर्भः-** मा. मुख्यमंत्री यांची दिनांक 21.07.2022 रोजीची बैठक.

मा. मुख्यमंत्री यांनी दिनांक 21.07.2022 रोजी दुपारी 02.00 वाजता आयोजित केलेल्या सभेमध्ये जारी केलेल्या आदेशान्वये सुधारीत मार्गदर्शीका निर्गमित करण्यात येत आहे.

1) गणेश मंडळांच्या मंडपांच्या परवानगीसाठी रु.100/- शुल्क पुर्णपणे माफ करण्यात येत आहे. तसेच जर यापुर्वी गणेशोत्सव 2022 साठीच्या मंडपांच्या परवानगीकरीता मंडळांनी शुल्क भरुन परवानगी प्राप्त केली असेल तर अशा मंडळांना रु.100/- चा परतावा लवकरच करण्यात येईल.
2) गणेशोत्सव 2022 करिता मूर्तिकारांच्या मंडपांकरिताचे शुल्क प्रमुख अग्निशमन अधिकारी यांच्याकडून पूर्णपणे माफ करण्यात येईल. तसेच ज्यांनी याअगोदर शुल्क भरले असेल तर त्यांना सदर शुल्काचा परतावा करण्यात येईल.
3) गणेशोत्सव 2022 करिता अनुज्ञापन खात्यामार्फत आकारण्यात येणारे जाहिरात शुल्क पूर्णपणे माफ करण्यात येईल. तसेच ज्यांनी याअगोदर शुल्क भरले असेल तर त्यांना सदर शुल्काचा परतावा करण्यात येईल.
4) महापलिकेच्या मंडप उभारणी बाबत उद्यान खाते व मालमत्ता खाते व खाजगी भूखंडावर आकारण्यात येणारे शुल्कदेखील माफ करण्यात येईल.
5) सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या गणेशमूर्तींसाठी कमाल उंचीचे कोणतेही निर्बंध 2022 च्या गणेशोत्सवाकरिता असणार नाहीत.
6) घरगुती गणेश मूर्तींसाठी या अगोदर 2 फुट उंचीची कमाल मर्यादा निश्चित करण्यात आली होती. तरी आता घरगुती गणेश मूर्तींसाठी उंचीची कोणतीही मर्यादा असणार नाही. परंतु घरगुती मूर्तीच्या उंचीवर स्वखूशीने 2 फुट उंचीची मर्यादा पाळण्याबाबत आवाहन करण्यात येईल.
7) नैसर्गिक विसर्जन स्थळी तसेच कृत्रिम विसर्जन स्थळी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत विद्युत रोषणाईची व्यवस्था करण्यात येईल.
8) आगमन व विसर्जन रस्त्यांवर संबंधित विज पुरवठादार यांच्यामार्फत विजेच्या व्यवस्थतेबाबत संबंधित विभागीय सहा.आयुक्त यांच्यास्तरावर चर्चा करुन आवश्यक ती सुधारणा (दिवा बत्तीची संख्या व क्षमता) करण्यात येईल.
9) मंडप शुल्क माफ करण्यात आले असले तरीसुध्दा विविध परिपत्रकांमध्ये असलेल्या अटी व शर्तींचे पालन करणे आवश्यक आहे. (उदा. अग्निशमन दलाचे कोडीफाईड शर्ती, अनुज्ञापन खात्याचे अटी व शर्ती, इ.)

| | | |
|---|---|---|
| सही/-22.07.2022 | सही/-22.07.2022 | सही/-22.07.2022 |
| **उपायुक्त (परिमंडळ-2)** | **अतिरिक्त आयुक्त (पू.उप.)** | **बृहन्मुंबई महानगरपलिका आयुक्त** |

प्रत रवाना –

सह आयुक्त / उप आयुक्त (परि-1, 3, 4, 5, 6,7), मा.महोदय/महोदया,
सहाय्यक आयुक्त, ए ते टी विभाग, महोदय/महोदया,
सहाय्यक आयुक्त (मालमत्ता), महोदय,
अनुज्ञापन अधिक्षक, महोदय,
उद्यान अधिक्षक, महोदय,
प्रमुख अग्निशमन अधिकारी, महोदय,
मा. महापालिका आयुक्तांचे स्वीय चिटणीस, महोदया,
मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (शहर) यांचे स्वीय चिटणीस, महोदय,
मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) यांचे स्वीय चिटणीस, महोदय,
मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) यांचे स्वीय चिटणीस, महोदय,
मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (प्रकल्प) यांचे स्वीय चिटणीस, महोदय,
मूर्तीकार / समन्वय समित्या

(Signature) 22/7/2022

उप आयुक्त (परि.-दोन) यांचे
प्रशासकीय अधिकारी